-१- (२५) -१२९-

*महसूल दिन साजरा करणे*
दिनांक: १ ऑगस्ट

**महाराष्ट्र शासन,**
**महसूल व वन विभाग,**
शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-१०/००/प्र.क्र.३०६/म-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १९ जुलै २००२

...गम विभाग ... 2002 ...

**पहा:-** १)शासन परिपत्रक, महसूल वन विभाग
क्रमांक:संकीर्ण-१०/००/प्र.क्र.३०६/म-५, दिनांक १६.१०.२०००
२)शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग
क्रमांक: आरईव्ही १०२००१/प्र.क्र.४५/टी-२, दिनांक १.८.२००१

**प्रस्तावना:-** महसूल विभागाकडे, महसूली कामकाजाशिवाय इतरही बरीच कामे सोपविलेली आहेत.यापैकी काही कामे कालमर्यादेची आणि महत्वाची असल्यामुळे जिल्हा स्तरावरील महसूली यंत्रणा त्यात गुंतून पडते. महसूल विभागाच्या मूळ कामकाजाचे वेळापत्रक या प्रक्रियेत कोलमडून पडते. महसूली कामांकडे यामुळे दैनंदिन व कमी महत्वाची कामे अशा दृष्टीने पाहिले जाते. परिणामत: भूमी अभिलेख अद्यावत करण्यासारखी कामे देखील वेळच्यावेळी होत नाहीत.

२. वरील बाबींशिवाय, गेल्या काही वर्षात शासनाच्या वित्तीय संसाधनावर ताण पडल्यामुळे महसूली वसुलीवर अधिकाधिक भर देण्यात आलेला आहे. महसुली यंत्रणेने शासनाच्या आवाहनास योग्य तो प्रतिसाद देऊन प्रत्येक वर्षी महसूली वसुलीचे उद्दिष्ट ओलांडले आहे. जे अधिकारी/कर्मचारी महसुली वसुलीचे उद्दिष्ट ओलांडण्याकरिता तसेच महसूल खात्याच्या मूलभूत जबाबदा-या पार पाडण्याकरिता अथक प्रयत्न करतात अशा अधिकारी/कर्मचा-यांचा यथोचित सत्कार होणे आवश्यक आहे. अशा कर्मचा-यांचा जाहीर सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक:-** जिल्हा स्तरावरील महसूली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे, वसुलीच्या नोटीसेस पाठविणे, मोजणी करणे, अपील प्रकरणाची चौकशी करणे इ. कामे वेळच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचा आणि महसूली वसुलीचे उद्दिष्ट पार करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचा सत्कार करण्याकरिता आणि महसूल



आयुक्त कोकण विभाग
... कार्यालय, ... सचिवालय
मुंबई-४०००३२
2? JUL 2002

विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरिता **दिनांक १ ऑगस्ट** हा दिवस येथून पुढे महसूली दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा.

महसूल दिनाचे आयोजन करतांना, ते पहिल्या वर्षी जिल्हा मुख्यालयामध्ये ठेवण्यात यावे. व त्यानंतर शक्यतो ग्रामीणी भागामधील वेगवेगळया तालुक्यांमध्ये घेण्यात यावा. या कार्यक्रमात समाजातील सर्व थरातील नागरिकांना सहभागी करुन घेण्यात यावे. आणि जनतेस शासनाकडून चालविल्या जात असलेल्या विकास योजनांची माहिती देण्याची व्यवस्था करण्यात यावी. जिल्हाधिका-यांनी आपल्या कल्पकतेने हा कार्यक्रम अधिकाधिक आकर्षक करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करावे. या कार्यक्रमात, ज्या महसुली अधिकारी/कर्मचारी यांनी उत्तम काम केले आहे अशा अधिकारी/कर्मचा-यांचा गौरव करुन जाहीर सत्कार करावा. अधिकारी व कर्मचा-यांची निवड करतांना त्यांचे खालील कामकाज विचारात घेण्यात यावे:-

(१) ग्रामीण पातळीवर तलाठयांच्या कामकाजात सुधारणा करुन त्यांचे दप्तर अद्यावत केलेले असणे.

(२) महसूली लेख्याच्या आधारावर महसूली वसुलीची मागणी निश्चित करण्यात येऊन त्यानुसार नोटीसेस तयार करण्याची कार्यवाही सुरु करणे.

(३) मंडल निरीक्षक यांचेकडे प्रलंबित असलेल्या चौकशी प्रकरणातील ९० टक्के प्रकरणे पूर्ण करणे , **तलाठी/अव्वल कारकून/ संकलन धारक**

(४) नवीन अनधिकृत बिनशेती प्रकरणे व शासकीय जमिनीवरील शर्तभंगाची प्रकरणे शोधून काढून त्या विषयीचा अहवाल तलाठयांनी तहसीलदारांना सादर करणे.

(५) लेखा आक्षेपाविषयीचा आढावा घेऊन हा आढावा त्यावरील कार्यवाही अहवालासह जिल्हाधिका-यांना सादर करणे.

(६) भूसंपादन कायद्याखाली ताब्यात घेतलेल्या जमिनीचा शेतसारा कमी करणे, त्यानुसार दप्तर अद्यावत करणे.

(७) शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे दूर करणेबाबत केलेली परिणामकारक कार्यवाही .

(८) महसूली वसूलीचा आढावा घेणे.

(९) दुस-या तालुक्यातील/अधिका-यांकरवी जिल्हयातील निवडक योग्य कर्मचा-यांची दप्तर तपासणी करणेत यावी.

(१०) टिपणीमध्ये कायद्यातील तरतुदींचा उल्लेख अचूक असणे.

(११) दंडाधिकारी स्वरुपाचे वैशिष्टयपूर्ण कामकाज वर्षात हाताळलेले असावे.

(१२) शासनाचे बुडत असलेले उत्पन्न कल्पकतेने शोधून काढलेले असावे.

(१३) तालुक्यातील गावातील विविध शासकीय खात्यांचा योग्य समन्वय साधलेला असावा.

जिल्हाधिका-यांनी वरील निकषाशिवाय इतर महसूली कामांचा देखील याप्रसंगी आढावा घ्यावा. प्रत्येक बाबीस काही गुण विहित करावे आणि अधिकारी/कर्मचा-यांच्या कामगिरीस गुण देऊन एकत्रित गुण विचारात घ्यावे.

प्रत्येक तालुक्यातून गावांची संख्या लक्षात घेऊन ५ ते १० कर्मचारी, जिल्हास्तरावरील ४ ते ५ अधिकारी निवडावेत. ज्या कर्मचा-यांना निवडपात्र ठरवणेत आले आहे त्यांची कामगिरी लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हयातील अंतिम निवड यादीस विभागीय आयुक्तांची १५ जुलैपर्यन्त मान्यता घ्यावी.

या कार्यक्रमाच्या आयोजनपूर्व व आयोजनपश्चात प्रसिध्दीसाठी प्रसिध्दी माध्यमांचे सहकार्य घ्यावे. अशा प्रकारे महसूल विभागाने जनतेपर्यन्त पोहोचून शासनाबद्दल व शासनाच्या कामकाजाबद्दल विश्वास वृध्दिंगत करावा. महसूली दिनाच्या आयोजनाकरिता कार्यालयीन तरतुदीतून खर्च भागविण्यात यावा तसेच आयोजनाचे वेळी अनावश्यक खर्च टाळण्यात येऊन कार्यक्रमाचे स्वरुप साधे असावे. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत आवश्यक तेथे विभागीय आयुक्तांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. डि.के.शंकरन)
शासनाचे प्रधान सचिव